


|| श्री गजानन प्रसन्न ||

|| श्री केशवराज प्रसन्न ||

Book Packet
Containing periodical

R.N.I. No. : MAHMAR/2000/4869


देवधर मंडळ

## आपली आहे प्रगतीची

# वाटचाल


❋ वर्ष २१ वे, अंक ४ ❋

दि. १५ डिसेंबर २०२१ ❋ किंमत रु. २०/-


2022
HAPPY NEW YEAR!

**सर्वांना नूतन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा !**

# देवधर मंडळ कार्यकारिणी

## दि. १ /४/२०१९ ते दि. ३१/३/२०२४

※ **अध्यक्ष**

**सी.ए. सुरेश विश्वनाथ देवधर** (कु. वृ. पान २१/१६२)
१०२, आय विंग, प्रणय नगर, राममंदिर रोड (विस्तारित), बाभई, बोरिवली (प.), मुंबई ४०००९१
दूरध्वनी : ०२२-२८९८१८५६
मोबाईल : ९२२३३६६६४०, ९२२३५०६९८८

※ **उपाध्यक्ष**

**ॲड. पुरुषोत्तम गोपाळ देवधर** (कु. वृ. पान ३६०/१६९)
ब्लॉक नं. २, भागिरथी टॉवर्स, सर्व्हे नं. ६, हि. नं. ११, कोकण एक्स्प्रेस हॉटेल लेन, कोथरूड, पुणे ४११०३८. ❖ मोबाईल : ९८६०३०६३४४

※ **कार्यवाह**

**सरिता मुकुंद देवधर** (कु. वृ. पान नं. ३५९/१२९)
११, रामकृष्ण भुवन, गोरेगांवकर बिल्डिंग नं. ६, गिरगांव, मुंबई ४००००४.
दूरध्वनी : ०२२-२३८९३९३०
मोबाईल : ९८२०६५९४४७

※ **सहकार्यवाह**

**सौ. पूर्वा प्रमोद देवधर** (स्वीकृत)
(कु. वृ. पान ८८२/१३२२)
११/१२ सी, दुसरा मजला, झावबा वाडी, ठाकूरद्वार, मुंबई ४००००२. मोबाईल : ९८६९९३९०७२

※ **कोषाध्यक्ष**

**सी.ए. अकल्पिता चिंतामणी देवधर**
(कु. वृ. पान८९८/१७७८)
देवधर हाऊस, दत्त आळी, गावदेवी चौक, कल्याण (प.) ४२१३०१. मोबाईल : ९८२०३५६४१३

※ **वाटचाल (मुद्रक, प्रकाशक)**

आशिष राम देवधर (कु. वृ. पान ३१/२०३६)
सी/२५, सुरांकित, सिद्धेश्वर आळी, पारनाका, कल्याण (प.) ४२१३०१. मोबाईल : ७०४५३५३६०२

※ **सभासद**

**नारायण (दिलिप) गोविंद देवधर** (कु.वृ. पान ४१८/१२३)
बी/१०३, आर.एन. ए. हाईट्स, जोगेश्वरी-विक्रोळी लिंक रोड, अंधेरी (पू.), मुंबई ४०००९३.
दूरध्वनी : ०२२-२८२५२१४५
मोबाईल : ९८१९९७२५११

※ **सभासद**

**श्री. वासुदेव नारायण देवधर** (कु.वृ.पान ४९७/१४५)
(स्वीकृत)
सी/३, १०२, सॅटेलाईट क्लासिक, रेल्वे स्टेशनजवळ, गुंफा रोड, जोगेश्वरी (पू.), मुंबई ४०००६०
दूरध्वनी : ०२२-२८२६१०२८, मो.: ९८२०१३४०८४

**संजय सुधाकर देवधर** (कु. वृ. पान ४९१/१७७९)
ए/४२, अनुभव कॉम्प्लेक्स, स्नेह पॅराडाईज, एम.आय.टी कॉलज रोड, कोथरूड, पुणे ४११०३८.
मोबाईल : ९८२३०७३३११

**श्री. समीर सुरेश देवधर** (स्वीकृत)
बी/२४, कैलासधाम सोसायटी, गोपाळनगर गल्ली क्र. १, टायटन शोरूम च्या जवळ, डोंबिवली (पू.) ४२१२०१
मोबाईल : ९८३३१४८४८५

**श्री. विष्णू विनायक देवधर** (स्वीकृत)
(कु.वृ.पान ४३९/१५२८)
बी-४, रूम नं. ३, सप्तर्षी सोसायटी, पांडुरंग वाडी, आनंदनगर, मानपाडा रोड, डोंबिवली (पू.) ४२१२०१
दूरध्वनी : ०२५१-२८०१८३०, मो. : ९८३३१५३९८९

**कु. मीरा जगदीश देवधर** (स्वीकृत)
(कु.वृ.पान ५३४/२४०६)
स्वप्नशिल्प, फ्लॅट नं. १, पहिला मजला,
नयनतारा नर्सिंग होम शेजारी, गुलमोहर कॉलनी,
सांगली ४१६४१६. मोबाईल : ७०८३८४१४५५

**श्रीमती शुभांगी सुनिल देवधर** (कु. वृ. पान ३१०)
वैनतेय, प्लॉट नं. ३८, प्रेस्टिज पार्क, घाडगे नगर, नाशिक रोड, नाशिक ४२२१०१
दूरध्वनी : ०२५३-२४६४७८०
मोबाईल : ९८९०२४०५२२

※ **मानद लेखा परीक्षक**

**सी.ए. किरण अनंत देवधर** (कु.वृ. पान १६२/१३७४)
१८ ई स्केअर, स्टेट बँकेच्या वर, शहाजी राजे मार्ग, विलेपार्ले (पूर्व) मुंबई ४०००५७
मोबाईल : ९८२०३३५०९३

# अध्यक्षांचे मनोगत



नमस्कार,

'विज्ञान शाप की वरदान' या विषयावर शाळेत असताना निबंध लेखन किंवा परिसंवाद होत असे. त्याची आठवण येण्याचे कारण 'ओमायक्रॉन' या कोरोना विषाणूचा अफ्रिकेसारख्या हजारो मैल दूर असणाऱ्या देशातून भारतात किंवा जगातल्या इतर देशात होणारा प्रसार आणि पुन्हा धास्तावलेले आपण सर्व विज्ञानाच्याद्वारे होणाऱ्या प्रगतीचे पर्यायाने समृद्धीचे आपण लाभधारक! त्याचबरोबर वेगाने पसरणाऱ्या या विषाणूचे दुष्परिणाम भोगणारेही आपणच! असो...

सध्यातरी कोरोनाचे संकट दूर झाल्याने आपण आपले सुनियोजित आयुष्य जगतो आहोत. बरेचसे आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक कार्यक्रम मार्गी लागत आहेत. आपल्या मंडळाच्या कार्यकारिणीच्या सभा, वार्षिक सर्वसाधारण सभा व्यवस्थित पार पडत आहेत. दि. २०२१-२२ चे स्नेहसंमेलन दि. २९ व ३० जानेवारी २०२२ रोजी पुणे येथे आयोजित केली आहे. त्याची तयारी आपले कार्यकर्ते विशेषत: तरुण कार्यकर्ते जोशात व जोरात करीत आहेत.

या संमेलनात आपल्या प्रथेप्रमाणे 'स्मरणिका' प्रसिद्ध करणार आहोत. त्यासाठी आपले लेख, कविता, प्रवासवर्णन विनोद इ. साहित्य लवकरात लवकर स्मरणिकेचे संपादक श्री. पुरुषोत्तम देवधर (पी.जी.) यांच्याकडे पाठवावे. या स्मरणिकेसाठी जाहिरात, शुभेच्छा, पृष्ठप्रायोजकत्व जरूर द्यावे ही विनंती. या वर्षीच्या स्मरणिकेची मध्यवर्ती कल्पना आहे 'युवा प्रेरणा'. शक्यतो त्या कल्पनेनुसार साहित्य पाठवावे. इतरही साहित्य पाठवायला हरकत नाही.

२९ जानेवारी २०२२ रोजी आयोजित केलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमात 'भारतीय स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव' या विषयावर परिसंवाद होणार आहे. त्यात आपले तरुण सभासद स्वत:चे विचार मांडतील. अन्य मनोरंजनाचे कार्यक्रम नृत्य, नाट्य, प्रश्नमंजुषा इ. कार्यक्रमांचाही समावेश आहे.

दुसरे दिवशी रविवारी ३० जानेवारी रोजी जीवनगौरव पुरस्कार, स्मृतिगौरव पुरस्कार, लग्नाला ५० वर्षे पूर्ण केलेल्या दांपत्यांचे सत्कार व वयाची पंचाहत्तरी पूर्ण केलेल्यांचे सत्कार असे असतील. तसेच मंडळाच्या ५४ वर्षांच्या वाटचालीसंबंधी एक चित्रफित इ. भरगच्च कार्यक्रम असतील.

नेहमीप्रमाणे सुग्रास, चविष्ट भोजन, नाष्टा, चहा हे असणारच!

या वर्षीचे स्नेहसंमेलन प्रथमच सशुल्क असणार आहे. शुल्क नाममात्र रु. ५००/- प्रत्येकी इतके असेल. हे शुल्क दोन दिवसांचे मिळून असेल. अशा या संमेलनाचा आनंद आपल्या सर्व सभासदांनी घ्यायलाच हवा.

चला तर कार्यकारिणीच्या कोणत्याही सभासदाशी संपर्क साधून आपली उपस्थिती कळवावी आणि शुल्क भरावे.

आता पुढचा वाटचालचा अंक १५ मार्च २०२२ म्हणजेच नवीन वर्षात येईल.

जाणाऱ्या वर्षाला निरोप देऊया आणि येणाऱ्या नवीन वर्षाचे स्वागत करुया! खुल्या दिलाने आणि खुल्या वातावरणात!

पान ३ वर

# देवधर मंडळ

## * वार्षिक स्नेहसंमेलन २०२१-२०२२ *

नमस्कार,

आपल्या मंडळाचे वार्षिक स्नेहसंमेलन २९ व ३० जानेवारी २०२२ (शनिवार – रविवार) 'स्वामी कृपा हॉल' कर्वे रोड, पुणे येथे आयोजित केले आहे.

### * स्नेहसंमेलनाची रूपरेषा *

**शनिवार, २९ जानेवारी :**

| | |
|---|---|
| दुपारी ४.०० ते ४.३० | : स्वागत, नोंदणी, चहा |
| दुपारी ४.३० ते ८.०० | : सांस्कृतिक कार्यक्रम |
| रात्री ८.०० ते ९.०० | : भोजन |

**रविवार, ३० जानेवारी**

कार्यक्रमाची वेळ सकाळी ८.३० ते दुपारी ४.००

| | |
|---|---|
| सकाळी ८.३० ते ९.३० | : स्वागत, नोंदणी, नाश्ता |
| सकाळी ९.३० ते १.३० | : स्नेहसंमेलन |
| दुपारी १.३० ते २.३० | : स्नेहभोजन |
| दुपारी २.३० ते ४.०० | : परस्पर परिचय |
| दुपारी ४.०० | : चहापान व समारोप |

**स्नेहसंमेलनाची सविस्तर रूपरेषा**

* केशवराज पूजन व आरती. दीपप्रज्वलन, स्वागतगीत
* प्रमुख पाहुण्यांचे स्वागत, परिचय, स्मरणिका प्रकाशन
* मंडळाच्या गेल्या ५४ वर्षातील वाटचाल संदर्भात फिल्म शो
* विशेष कार्य – कर्तृत्वाबद्दल पुरस्कार वितरण
* वयाची ७५ वर्षे/ १०० वर्षे पूर्ण केलेल्या सभासदांचा सत्कार
* विवाहास पन्नास वर्षे पूर्ण केलेल्या सभासद जोडप्यांचा सत्कार
* विशेष कर्तुत्ववान कुलबंधु–भगिनींचा गौरव
* प्रमुख पाहुण्यांचे मनोगत
* अध्यक्षांचे मनोगत
* आभार
* पसायदान

***

या वर्षी हे स्नेहसंमेलन सशुल्क असणार आहे. शुल्क रु. ५००/– फक्त. कृपया याची नोंद घ्यावी. आपली नावे नोंदवून शुल्क कार्यकारिणी सभासदांकडे जमा करावे. बँक ट्रान्स्फर करूनही शुल्क जमा करू शकता. (शुल्क जमा करून नाव नोंदणी करण्याची तारीख १० जानेवारी २०२२ पर्यंत आहे.).

**विशेष टीप :** ज्या सदस्यांना दि. २९ जानेवारी रोजी हॉलवर राहण्याची सुविधा हवी असेल त्यांनी श्री. संजय देवधर, पुणे यांच्याशी संपर्क साधावा.

जास्तीत जास्त संख्येने स्नेहसंमेलनात सहभागी होऊन आपला आनंद सहस्त्रपटीने वाढवूया.

आपले स्नेहांकित

**मंडळाचे पदाधिकारी व सदस्य**

***

## ❊ स्मरणिका ❊

दरवर्षीप्रमाणे या वर्षीही स्मरणिका काढणार आहोत. या स्मरणिकेसाठी 'युवा – प्रेरणा' ही मध्यवर्ती कल्पना (थीम) आहे. कर्तृत्वाने संपन्न – अनुभवाने संपन्न – अशा तरुणांनी जास्तीत जास्त सहभाग घ्यावा. आपले साहित्य (लेख – कथा – कविता) स्मरणिकेचे संपादक श्री. पु. गो. देवधर मो. नं. ९८६०३०६३४४ यांच्याकडे १५ डिसेंबर पर्यंत पाठवावेत.

तसेच स्मरणिकेसाठी जाहिरातीही मिळवून द्याव्यात. ज्यांना जाहिराती मिळविणे शक्य नसेल त्यांनी पृष्ठ प्रायोजिकत्व घ्यावे. त्यासाठी देणगीमूल्य रु. ३००/– फक्त आहे.

आपल्या उत्पादक / उद्योजक कुलबांधवांसाठी 'स्टॉल्स' उपलब्ध आहेत. त्यासाठी नाममात्र भाडे रु. ५००/– आकारले जाईल. (दोन्ही दिवसांसाठी मिळून)

स्नेहसंमेलनासाठी अधिक माहिती – तपशीलासाठी कार्यकारिणीच्या सभासदांशी संपर्क साधावा.

चला तर, २०२२ या नवीन वर्षाची सुरुवात मंडळाचे स्नेहसंमेलन उत्तम रितीने संपन्न करुया. २०२२ हे वर्ष आपणासाठी आरोग्यदायी, सुखासमाधानाचे, ऐश्वर्यसंपन्न होण्यासाठी श्री केशवराजचरणी प्रार्थना!

देवधर मंडळाच्या बँकांचा तपशील

Account- Deodhar Mandal Madhyavarti

Bank of Maharashtra
Branch- Patharli Dombivali East
IFSC MAHB0000536
AC No 60023916021

IDBI BANK , Kalyan
Deodhar Mandal Madhyavarti
Saving account no : 45310010007645

IFSC : IBKL0000456

पान १ वरून

नववर्षाची पहाट नवी
घेऊन आले आशा नवी।
संपून जाऊदे संकट कोरोनाचे
सुख अनुभवू पुन्हा मुक्त श्वसनाचे।
नववर्षाचे स्वागत करुया
निर्बंध, मुक्त जीवन पुन्हा जगूया।।

येणारे नवीव वर्ष सर्वांना निरामय आरोग्याचे सुखसमृद्धीचे, आनंदाचे जावो हीच केशवराज चरणी प्रार्थना!

***



## ❊ यंदाचे पुरस्काराचे मानकरी ❊

दरवर्षीप्रमाणे या वर्षीही मंडळातर्फे पुरस्कार दिले जाणार असून यंदाचे मानकरी आहेत...

❊ जीवन गौरव पुरस्कार
मानकरी – श्री. नरेश दीक्षित, डोंबिवली

❊ वि. शं. देवधर स्मृति गौरव पुरस्कार
(समाजसेवी सभासद)
आदिती देवधर

❊ कमळाबाई केशव देवधर पुरस्कार
(शैक्षणिक कार्य)
श्री. संदीप देवधर, पुणे

❊ सौ. नलिनी मनोहर देवधर
(विशेष गौरव पुरस्कार)
श्रीमती अनुराधा दीक्षित

# शब्दकोडे

- रचनाकार : **श्री. पु. गो. देवधर,** पुणे

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ४ | ५ | | ६ | X | ७ |
| ८ | | X | ९ | | | X | १० | | |
| | X | ११ | | X | X | १२ | | X | |
| १३ | | X | X | १४ | | X | X | X | X |
| | X | १५ | १६ | | X | १७ | १८ | | X |
| १९ | २० | | | X | २१ | | | X | २२ |
| X | | X | X | | | X | २३ | २४ | |
| २५ | | २६ | | X | | X | २७ | | X |
| २८ | | | X | X | X | २९ | X | ३० | ३१ |
| ३२ | | | | X | ३३ | | | X | |

**आडवे शब्द :–**

१) मराठ्यांची युद्धपूर्तीची गर्जना ८) भरतीओहटी मधील काळ ९) हात देणे १०) सहेतुक ११) राजा १२) शेवट १३) दु:ख १४) सोबत १५) कूर्म १७) धोकादायक १९) कागाळी २१) सफेद २३) कपि २५) एक मिठाई २७) सूर्य २८) कसदार ३०) जलवाहिनी ३२) नाश पावणे ३३) अस्ताव्यस्त

**उभे शब्द :–**

१) अगदी सहज २) लक्ष्मी ३) दान वाटपाची जागा ४) हत्तीच्या मस्तकातून स्रवणारा ५) कर ६) पहिला ऋतू ७) इच्छा १४) सज्जन १५) तुरुंग १६) फुलांचा हार, आदरार्थी बोलणे १७) जखम, इजा १८) समशेर २०) विष्णू २१) अवनी २२) पुरुष २४) नवा २५) कौशल्य २६) जुनी वस्ती २९) भित्रा प्राणी ३१) नवऱ्याचा भाऊ

(उत्तरे इतरत्र)

# संयमी व्यक्तीमत्व - प्रा. डॉ. सुनिल देवधर

- श्रीमती शुभांगी सुनिल देवधर, नाशिक

(देवधर मंडळाचे माजी उपाध्यक्ष कै. प्रा. डॉ. सुनिल देवधर यांचा १९ जानेवारी हा वाढदिवस. त्यांना शब्दसुमनांनी वाहिलेली श्रद्धांजली.)



अत्यंत शांत संयमी स्वभाव, कधीही कुणावर आवाज चढवून बोलणे नाही, कुणालाही अंडरएस्टिमेट करणे नाही, कोणालाही टाकून बोलणे नाही. कायम जनमताचा विचार करून कधीही कोणत्याही गोष्टीवर थेट मतप्रदर्शन नाही. मनाचा आणि विचारांचा अथांग डोहच जणू. पत्नी म्हणून मलाही कधी त्यांचा तळ दिसला नाही. हे वर्णन प्रा. डॉ. सुनिल गोपाळ देवधर यांच्या स्वभावाचं.

खूप लहानपणी पितृछत्र हरपले. यामुळे आयुष्य बदलले. हट्ट, चैन, लाड या गोष्टी विसरून आपला कोणालाही त्रास होणार नाही असंच वागायचं आहे, ही मनाशी खूणगाठ बांधली. आपले आपण शिक्षण घेऊन आपला मार्ग आपणच शोधायचा आहे हे सुद्धा निश्चित केलं. लहान म्हणून घरात दुर्लक्षितच राहिले. पण त्यामुळेच आहे त्या परिस्थितीमध्ये जुळवून घेणे हाच आयुष्याचा फंडा.

एम्. कॉम. पर्यन्त शिक्षण झाले. वरच्या वर्गात पास झाल्याने नोकरी मिळाली. कॉलेजमध्ये प्राध्यापक म्हणून नोकरी मिळाली. कॉलेजमध्ये प्राध्यापक म्हणून नोकरी करतांना पैसा व प्रतिष्ठा दोन्ही मिळाले. मित्र परिवार पण चांगला मिळाला. नेहमी म्हणायचे मागच्या जन्मीचं पुण्य म्हणून ही नोकरी मिळाली. मग मात्र आयुष्याचा आलेख चढताच राहिला.

NCC Air Wing ची जबाबदारी आली आणि एका वेगळ्या पर्वाला सुरुवात झाली. मोठे मेव्हणे Air Force मध्ये असल्याने Air Force ची ओळख झाली होती. पण NCC Air Wing नी जणू प्रत्यक्ष Air Force चं आयुष्य थोडं का होईना, पण अनुभवता आलं. NCC ची मुलं व Air Force वर मनापासून केल. NCC च्या Tenare मध्ये सगळ्यात जास्त विद्यार्थांनी Commissioner Officer म्हणून सैन्यात प्रवेश केला. याचा सरांना खूप अभिमान होता. (आज इथे रणधीर कटोच, सुधीर कामत, कैलास मुदलीचार या विद्यार्थ्यांची आठवण येते.) त्यासाठी देवधर सरांचा सत्कार Air Force नी व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने देखील केला.

या यशाच्या वाटेवर पूढे Ph.D पूर्ण केले. कॉलेजमध्ये ॲडमिशन कमिटी, एक्झामिनेशन कमिटी, सांस्कृतिक कमिटी, NACC कमिटी अशा अनेक कमिट्यांवर काम केले. सर्व जबाबदाऱ्या यशस्वीपणे पूर्ण केल्या. प्राध्यापक मंडळींचं गॅदरिंग हा वर्षातून एकदा मोठा कार्यक्रम असे. प्राध्यापक मंडळींचे सुप्त गुण व्यासपीठावर कळायचे. त्यांचे प्रेरणास्त्रोत देवधर सर होते. देवधर सरांच्या कविता हे कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण असे.

या बरोबरच देवधर मंडळ, चितपावन ब्राह्मण संघ, महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी (लाईफ मेंबर) अशा संस्थांमध्ये पण संपूर्ण योगदान असे.

कुठेही स्वत:च्या कामाचा गवगवा नाही, वाच्यता नाही, गुपचूप काम करत राहायचे. अनेक गरजूंना आर्थिक मदत नेहमी करायचे. मलाही हे

# जन्मशताब्दी कृतज्ञता दिवस
# दत्तात्रय गोपाळ देवधर - बाबा

काही व्यक्ती वटवृक्षासारख्या असतात. दत्तात्रय गोपाळ देवधर त्यापैकी एक होते. कोकणातील कोरले हे त्यांचे मूळ गाव. 'बाबा' या नावाने सुपरिचित असलेले हे व्यक्तिमत्व समाजातील होतकरू तरुण आणि अडीअडचणीत असलेल्या प्रत्येकासाठी आधारस्तंभ होते.



वयाच्या सोळाव्या वर्षी ते मुंबई गिरगावात फडके मामांकडे आले. एका इलेक्ट्रिक दुकानात दिवसभर नोकरी करून रात्री शाळा व अभ्यास करीत असत. १९३८ ते १९५८ या काळात त्यांनी डॉक्टर सरदेसाई यांच्याकडे तर नंतर डोळ्यांचे डॉक्टर असलेल्या डॉक्टर परांजपे यांच्याकडेही काही काळ काम केले.

बाबांनी मुंबई मराठी साहित्य संघाच्या नाटकांमधूनही काम केले. त्यांनी काम केलेली भाऊबंदकी आणि होनाजी बाळा ही नाटके विशेष गाजली. भाऊबंदकी नाटकात ते नारायणराव पेशवे ही भूमिका साकारीत असत. दुर्गाबाई खोटे, केशवराव दाते यांच्यासारख्या दिग्गजांबरोबर त्यांना काम करण्याची संधी मिळाली.

बाबांनी काही वर्षे व्यवसाय केला. बरीच खटपट करून गिरगावातल्या गणपती मंदिराजवळ त्यांनी 'लक्ष्मी वस्त्र मंदिर' सुरू केले व आपल्या भावंडांना स्वतःच्या पायावर उभे राहण्यास मदत केली.

रत्नागिरी जिल्ह्यातील आसूद या गावी असलेले केशवराज देवस्थान देवधर कुटुंबीयांचे कुलदैवत आहे. तेथे नदीवर पूल बांधण्यासाठी आबा देवधर यांनी भरघोस दिली आहे.

कुटुंब आणि इतरांसाठी हे सर्व करीत असताना त्यांनी स्वतःच्या शिक्षणाचा आणि लग्नाचाही विचार केला नाही. वयाच्या चाळिशीत त्यांनी मॅट्रिकची परीक्षा दिली. त्यात उत्तम गुण मिळवले आणि म्हणून त्यांचा फोटोही तेव्हा वर्तमानपत्रात छापून आला होता. पुढे ते बँक ऑफ महाराष्ट्र मध्ये नोकरीला लागले. सर्व देवधर परिवार स्थिरस्थावर झाल्यानंतर उतारवयात त्यांनी दिवंगत सौ. शकुंतला वेलणकर यांच्या सोबत स्वतः चा संसार सुरू केला. ७ मार्च १९९९ या दिवशी बाबा अनंतात विलीन झाले.

***

---

पान ५ वरून .....

**कधी माहिती नसायचे. असे बिझी देवधर सर. पण पत्नी म्हणून माझा नेहमी ठरलेला प्रश्न असायचा. तुम्हाला काय काम असतात हो?**

**स्वयंपाकघरात मात्र अजिबात रस नव्हता, फार स्वयंपाकघराकडे फिरकायचे पण नाहीत. साऊथ इंडियन डिशेस खूप आवडायच्या. गोड मनापासून आवडायचे. मधुमेहाचा त्रास नव्हता आणि त्याची भीतीही नव्हती. माझ्या हातच्या पुरणपोळ्या आणि नारळाच्या वड्या हे खास आवडीचे पदार्थ होते. मला नेहमी म्हणायचे तुझ्या नावाचा ब्रँड कर. मार्केटमध्ये फेमस होईल. रिटायर्डमेंट नंतर काहितरी करू अशी चर्चाही आमच्यात होत असे.**

**देवधर सर सोबत होते पण त्यांच्या समोर मी कधी एवढं त्यांच कौतुक केल नाही, याची खंत वाटते. आता मी त्यांच्यासाठी ग्रंथ जरी लिहिला तरी तो वाचायला ते येतील का?**

**'जो आवडे सर्वांना तोची आवडे देवाला.' ज्यांनी ज्यांनी सुनिल देवधरांची निधन वार्ता ऐकली त्यांच्या मनात हेच आलं असेल.**

***

# केशवराज

**– मंजिरी अतुल देवधर, ठाणे**

आपण भेट दिलेली काही स्थळं कायम मनात घर करून राहतात. तसच हे निसर्गाच्या कुशीत लपलेल आसूद गावच (दापोली) केशवराज मंदिर.

हे पाच हजार वर्ष जुनं श्री विष्णूचं मंदिर. एका रात्रीत पांडवांनी बांधलेलं, अशी याची अख्यायिका आहे.

इथे आल्यावर मेन रोडवरच गाडी पार्क करावी लागते. पार्किंगची सोय इथे नाही. त्यामुळे पाऊलवाटेनेच गावातून या मंदिराकडे चालत जावं लागतं. ही पाऊलवाट थेट मंदिराकडे जाते. हे केशवराज मंदिर उंचावर आहे. पाऊलवाट संपली की चढण लागते. चिऱ्याच्या दगडाने बांधून काढलेल्या पायऱ्या आहेत. दुतर्फा नारळ, पोफळीच्या बागा आणि गर्द झाडी आहे. हळद्या, खंड्या, सुतार पक्षी, दयाळ या सारख्या पक्षांचे आवाज सतत कानावर पडतात. मधेच एका झाडावरून दुसऱ्या झाडावर उड्या मारणारी माकडं दिसतात. चांदणीसारखी पांढरी शुभ्र सुरंगीची फुलं आणि जांभाच्या गुलाबी रंगाच्या फुलांचा सडा पडलेला दिसतो. जणूकाही फुलांच्या पायघड्याच घातल्या आहेत.

सावली आणि गारवा यामुळे थकवा अजिबात जाणवत नाही. मधे एक छोटीशी नदी लागते. पूर्वी ही नदी ओलांडून जाण्यासाठी साकव (लाकडी पूल) होता. आता सिमेंटचा पूल बांधला आहे. गारंबीचा बापू या चित्रपटाचं शुटिंग इथलंच. हा ब्रिज ओलांडून गेलं की काही मिनिटातच आपण मंदिराजवळ पोहोचतो. पाऊलवाटेने चालायला सुरुवात केल्यापासून साधारण वीस ते पंचवीस मिनिटात आपण मंदिराजवळ पोहोचतो.

मंदिर तसं साधं आणि छोटसंच आहे. काळ्या दगडाचं. श्री विष्णूची चतुर्भुज काळी पाषाणी मूर्ती छान आहे. मंदिराच्या समोर गोमुख आहे. डोंगरातून उगम पावलेला झरा दगडी पन्हाळीतून मंदिराच्या प्रांगणात असलेल्या गोमुखातून बारा महिने वाहत असतो.

असं हे शहरापासून दूर असलेलं केशवराज मंदिर, मंदिराच्या परिसरातील एकांत, निरव शांतता आणि निसर्गाच्या सानिध्यात आल्यानंतर खऱ्या अर्थाने परमेश्वराच्या अस्तित्वाची जाणीव होते.

श्री केशवराज हे कौशिकगोत्री देवधर-दीक्षित-ढमढेरे यांच कुलदैवत आहे.

कधी दापोलीला आलात तर आवर्जून या मंदिराला भेट द्या. इतक शांत आणि निसर्गाच्या सानिध्यात असलेल ठिकाण मी तरी आजवर पाहिल नाही...

---

## देवधर मंडळ – वाटचाल जाहिराती

आपले त्रैमासिक, 'वाटचाल' सर्व कुलबंधू भगिनींना नित्यनेमाने आपली प्रगतीची वाटचाल कळवित असते. हे त्रैमासिक रंगीत अधिकाधिक ,वाचनीय आणि संग्राह्य होत आहे.

आता यात आपल्या उद्योग, व्यवसाय याची माहिती जाहिराती द्वारे देता येईल. यासाठी नाममात्र शुल्क आकारले जाईल. आपण यास भरभरून प्रतिसाद द्यावा ही विनंती.

**✻ जाहिरातीचे दरपत्रक ✻**

१/४ पान रुपये १००/-
१/२ पान रुपये २००/-
पूर्ण पान रुपये ४००/-
यात शुभेच्छा जाहिराती सुद्धा देता येतील.

**आडवे शब्द :–**

१) हर हर महादेव ८) समा ९) मदत १०) सकाम ११) राणा १२) अन्त १३) खेद १४) साथ १५) कासव १७) घातक १९) तकरार २१) धवल २३) वानर २५) कलाकन्द २७) रवी२८) सकस ३०) नदी ३२) बरबाद ३३) पसारा

**उभे शब्द :–**

१) हसतखेळत २) रमा ४) रमणा ४) मद ५) हात ६) वसंत ७) कामना १४) साव १५) कारा १६) सर, १७) घाव १८) तलवार २०) कमलाकर २१) धरणी २२) नर २४) नवीन २५) कसब २६) कसबा २९) ससा ३१) दीर

## क्षमस्व

## मुद्रण दोष

माहे सप्टेंबर २०२१ मधील वाटचालच्या अंकात 'आपण यांना अंतरलो' या सदरात खाली दोन मुद्रणदोष होते.

१) छापलेला मजकूर

सौ. स्वाती प्रसाद देवधर, डोंबिवली

मृत्यू ४ ऑगस्ट २०२१

सुधारणा :

सौ. स्वाती प्रभाकर देवधर, डोंबिवली

२) छापलेला मजकूर

सौ. जयश्री शंकर देवधर, पुणे

मृत्यू २६ मे २०११

सुधारणा :

सौ. जया रघुनाथ शेंडे

(पूर्वाश्रमीच्या जयश्री शंकर देवधर)

मृत्यू १६ ऑगस्ट २०२१

आम्ही दिलगीर आहोत.

# आपण यांना अंतरलो

* आशा विजय देवधर
  मृत्यू दि. ८-८-२०२१.
* गंगाधर गोपाळ ढमढेरे, पुणे.
  मृत्यू दि. १४-९-२०२१.
* रामचंद्र नारायण देवधर,
  ओटवणे, सावंतवाडी
  मृत्यू दि. २५-९-२०२१
* बाळकृष्ण धुंडिराज देवधर, पुण
  मृत्यू दि. ३-१-२०२१
* नीला बाळक्रुष्ण देवधर, पुणे.
  मृत्यू दि. ४-९-२०२१
* अनघा अनिरुद्ध मनोहर
  मृत्यू दि. १०-११-३०२१
  माहेरवाशीण
  पूर्वाश्रमीच्या वंदना विश्वास देवधर

**www.deodharmandal1968.org**

**या आपल्या वेबसाईटला अवश्य भेट द्या**



देवधर मंडळाच्या कार्यकारिणीची नैमित्तिक सभा मंडळाचे अध्यक्ष श्री. सुरेश देवधर यांच्या घरी आयोजित करण्यात आली होती. त्या वेळी मंडळाच्या प्रथेप्रमाणे उपाध्यक्ष पु. गो. देवधर यांनी डॉ. सौ. सुगंधा व श्री. सुरेश देवधर यांचे आभार मानले.

सांगली येथील सांगली शिक्षण संस्थेतर्फे गुरुवर्य केशवराव दीक्षित गौरव व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते. या व्याख्यानमालेत आपले कुलबंधू आणि भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय सचिव मा. श्री. सुनिल देवधर यांचे 'ईशान्य भारत, पूर्वीचा व आजचा' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. कार्यकारी मंडळाची सदस्या मीरा जगदीश देवधर (सांगली) यांनी या वेळी सुनिल देवधर यांची सदिच्छा भेट घेतली. त्याची क्षणचित्रे



श्री. सुनिल देवधर यांचे स्वागत करताना कार्यकारी मंडळाची सदस्या मीरा देवधर.
सोबत डावीकडून श्री. विनीत मधुसूदन देवधर, श्री. जगदीश देवधर व सौ. हेमांगी विनीत देवधर

सांगली शिक्षण मंडळाच्या संचालक मंडळासह श्री. सुनिल देवधर.
डावीकडून
सौ. आरती रवींद्र देवधर व त्यांचे बाजूला
श्री. रवींद्र माधव देवधर (तासगाव)



## आपल्या मंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा नुकतीच संपन्न झाली. त्याची काही क्षणचित्रे











संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक श्री. वा. ना. देवधर यांचेसाठी आशिष देवधर यांनी साधना ऑफसेट, भारताचार्य वैद्य चौक, कल्याण येथे छापून, वैद्य वाडा, टिळक चौक, कल्याण (प.) ४२१३०१ येथे प्रसिद्ध केले.